# उषाकिरण आत्राम यांचा 'शिकार फत्ते झाली' कथासंग्रह : एक अध्ययन

संशोधक
**नंदकिशोर नैताम**
गोंडवाना विध्यापिठ, गडचिरोली
ईमेल-nandakishornaitam750@gmail.com

मार्गदर्शक
**डॉ. प्रकाश वट्टी**
नेवजाबाई हितकारिणी महा. ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर

---

***सारांश :***

*आदिवासी साहित्याचा अभ्यास करताना कथा साहित्यात काही मोजक्याच आदिवासी कथा लेखकांचे नावे पुढे येतात. आदिवासी कथा लेखकामध्ये माधव सरकुंडे, सर्वा (२०००), ताडम (२००१), नजूबाई गावित, नवसा भिल्लीणीचा एल्गार (२०१२), कुंडलिक केदारी, अस्वस्थ मी (२००७), बाबाराव मडावी, भाकर (२०१२), रामराजे आत्राम, नव लुगडं (२०११), मसनवाट (२०११), डॉक्टर संजय लोहकरे, डांगाणी माणसं (२०१५), राब (२०१८), कथा बोली (संपा. २०१५), सुनील गायकवाड, गल्लूर (२०१७), भोंगऱ्या (२०१४), संजय दुबाडे, पितळ (२०११), उषाकिरण आत्राम, अहेर (१९९६), शिकार फत्ते झाली (२०१८) यांची नावे समाविष्ट आहेत.*

*उषाकिरण आत्राम यांनी अहेर (१९९६) कथासंग्रहाचे रूपाने आदिवासी साहित्यातील प्रथम कथाकार म्हणून मान्यता मिळवली. आत्राम यांचा दुसरा कथासंग्रह शिकार फत्ते झाली, (२०१८), मध्ये प्रकाशित झाला. सदर कथासंग्रहात अहेर कथासंग्रहातील सहाही कथा समाविष्ट आहेत तर नऊ कथा नवीन आहेत.*

*संपूर्ण कथासंग्रहात स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, शोषण, अपमान आदिवासी समाज व बहुजन समाजाचे वास्तव चित्र लेखिकेने अतिशय प्रखरपणे, प्रामाणिकपणे मांडले आहे. समाजातील विकृती वासनांध लोक, स्त्री अत्याचार, आदिवासी समाजावरील अत्याचार, शोषणाविरोधात आवाज उठवून वेदनेला, अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम उषाकिरण आत्राम यांनी ताकदीने केले आहे. त्यांच्या लेखनाचा बिंदू स्त्री आहे आणि तिला प्रखरपणे संघर्ष करताना बोलती करण्याचे काम 'शिकार फत्ते झाली'मधून आत्राम यांनी केले आहे.*

---

**प्रस्तावना :**

आदिवासी साहित्याचे सौंदर्य वाढविण्यास ज्यांनी आपले साहित्य सजविले असे आदिवासी साहित्याच्या पहिल्या पिढीच्या साहित्यिका उषाकिरण आत्राम कथाकार, कवयित्री, नाटककार म्हणून साहित्य वर्तुळात सुपरिचित आहेत. गोंडी भाषेतील 'मोटूयारीन' काव्यसंग्रह (१९९३) प्रसिद्ध असून दुसरा मराठी काव्यसंग्रह 'म्होरकी' (१९९७) प्रसिद्ध झाला. आदिवासी साहित्यात प्रथमच पहिलाच कथासंग्रह उषाकिरण आत्राम यांचा अहेर(१९९६) माजी लोकसभा अध्यक्ष पी.एम.संगमा यांच्या हस्ते नागपूर येथून प्रकाशित झाला. तर दुसरा कथासंग्रह 'शिकार फत्ते झाली' २०१८ मध्ये प्रकाशित झाला. इतर साहित्य एक झोका आनंदाचा, बालगीत (२००१), लेखणीच्या तलवारी, काव्यसंग्रह (२००९), गोंडवाना की महान वीरांगनाएं, चरित्रपर (२००८), मोटूयारीन, गोंडी- हिंदी-मराठी

काव्यसंग्रह (२०१७), गोंडवाना में कचारगड पवित्र भूमी, माहितीपर (२०१८), अहेराचा बदला अहेर, एकांकिका (२०२१), गोंडवाना की जमापुंजी, संपादन (२०२१), मोटूयारिन इंग्रजी-हिंदी (२०२२), कलम की तलवारें, हिंदी अनुवाद २०२४ साली प्रकाशित झाले आहेत.

उषाकिरण आत्राम यांचे अनेक लेख, कविता, समीक्षा नियतकालिकात, मासिकात संपादित पुस्तकात प्रकाशित झाले आहेत. दिवंगत पती सुन्हेरसिंह ताराम यांच्यासोबत सन २०१८ पर्यंत 'गोंडवाना दर्शन' मासिकात सहसंपादक म्हणून काम केले. मे २०११ ला नागपूर येथे झालेल्या ९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषवले आहे. सध्या धनेगाव येथे आदिवासी भाषा संशोधन व विकास प्रकल्प ही संस्था चालवून आदिवासी भाषांवर त्यांचे निरंतर कार्य सुरू आहे.

उषाकिरण आत्राम यांच्या लेखनाचा मुख्य गाभा स्त्रीप्रधान असला तरी आदिवासी, वंचित, बहुजन समाजावरील अन्याय अत्याचाराविरुद्ध विद्रोहाचे अंश लेखनात सापडतात, म्हणून उषाकिरण आत्राम यांनी लेखणीला तलवार केले आहे. आत्राम यांचा कविता लेखन हा आवडता प्रांत असला तरी कथालेखन, चरित्रपर लेखन, बालवाङ्मय, नाटक, वैचारिक लेखन, समीक्षा लेखन, पुस्तकांचे संपादन साहित्य प्रकारात मोलाचे योगदान आहे. आत्राम यांनी मातृभाषा गोंडी, मराठी आणि हिंदी भाषेत विपुल प्रमाणात लेखन केले आहेत.

उषाकिरण आत्राम या आदिवासी साहित्य चळवळीतील प्रथम कथाकार म्हणून सुपरिचित आहे. त्यांचे अहेर कथासंग्रह (१९९६) व शिकार फत्ते झाली (२०१८) असे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. दोन्ही कथा संग्रहात आदिवासींच्या रोजच्या जीवनातील संघर्ष, दारिद्र्य दुःख, वेदना, स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार, ससेहोलपट, सरकारी माणसांकडून शोषण, बळी सोबत वंचित बहुजनांचे दुःख, दारिद्र्य स्वतः अनुभवल्याने त्याची प्रतिबिंब कथेत पडलेली आहेत. उषाकिरण आत्राम आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, "रानावनातल्या माणसांचे दुःख, उपासमारी, गरीबी, प्रत्यक्ष जीवनातले प्रखर अनुभव आणि अन्याय अत्याचार, शोषणाचे बळी ठरलेले जीव पाहून माझी लेखणी ते टिपू लागली. ती आक्रोशनारे भयभीत जग आणि त्यातल्या वेदना त्यांचं जगणं, विवळन, प्रतिकार या सर्वच कथा समाजातील अवतीभवतीच्या घटना आहेत."१

'शिकार फत्ते झाली' ही कथा असलेल्या कथासंग्रहाला शीर्षक दिलेले आहे. सदर कथासंग्रहातील मुखपृष्ठ कथासंग्रहाला साजेसं असून २२६ पानात एकूण १५ कथा समाविष्ट आहेत. कथासंग्रहाचे मूल्य ३९०₹ आहे. सदर कथा संग्रहात 'अहेर' कथा संग्रहातील बाजा, संघर्ष, परिवर्तन, अहेर, भूक व जनी अशा सहा कथा समाविष्ट आहेत. तर सदर कथासंग्रहात शीर्षक असलेली शिकार फत्ते झाली, सखी, समाधी, बटई, शिवराम, धर्मकला, अकरा लेकरांची माय, बहिण भाऊ व खातमा अशा एकूण पंधरा कथा या संग्रहात आहेत.

**कथाबीज :**

'शिकार फत्ते झाली' कथासंग्रह स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार व आदिवासी बहुजन वंचित समाजाच्या व्यथावेदना घेऊन येतात व त्याविरोधात एल्गार पुकारतात. कथासंग्रहात पिट्टेगुडा, चारोळी, शिकार, विधवा, सखी, वान-गुण, नवरा सोडी, भजन, घंटी, रक्तबंबाळ, अंधार, पोलीस, रांजण, कोदो कुटकी, जय सेवा, जमीनदार,

सावकार, मोट्यारीन, रेला, अहेर, पर्लकोटा, इंद्रावती, टाहो, तलाक, सल्ला-गांगरा, बलात्कार, नक्षलवाद हे शब्द आले आहेत.

**'शिकार फत्ते झाली' जीवन चित्रण :**

आदिवासी कथाकार-लेखिका उषाकिरण आत्राम यांनी जंगलव्याप्त दुर्गम एटापल्ली भागात नोकरीच्या निमित्ताने काम केले. त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी आदिवासी समाजावरील अन्याय, शोषण स्त्रियांवर होणारे शोषण बघितले व त्याविरुद्ध त्यांची लेखणी पुढे सरसावली आणि 'अहेर'व 'शिकार फत्ते झाली' असे कथासंग्रह पुढे आले.

'शिकार फत्ते झाली' ही शीर्षक कथासंग्रहात असलेली कथा बालाघाट डोंगरातील बारा टोल्यातील आदिवासींच्या संघर्षमय जीवनाची वास्तववादी कथा मनाचा ठाव घेते. पोलीस आणि फॉरेस्ट कर्मचारी, ठेकेदार महिलांच्या अब्रूशी किती नीचपणे खेळतात, एका लहान मुलीवर बलात्कार करून मारून टाकतात; दुसरीकडे लंगड्या माणसाला डोफाभर (पानांचा डोना) शहदासाठी अमानुष मारतात. आदिवासींवर होणाऱ्या शोषण, अत्याचाराबाबत ही कथा बरंच काही सांगून जाते.

'सखी' या कथेत एका स्त्रीची एका स्त्री कडूनच कशी ससेहोलपट होते याचे विदारक चित्र दिसते. सखी या गरीब मुलीला तिची आईच पैसे घेऊन संसार मोडायला सांगते. एक नव्हे तर चक्क चार नवरे होतात. सखी अडाणी, साधीसुधी पण सुंदर! तिच्या शरीराचा माय सौदा करते पण वाळलेल्या पाचोड्या समान दिशाहीन सखीच्या नशिबी सौभाग्य आणि नवरा नसतो. आयुष्यभर उरात जखमा घेऊन जगणाऱ्या सखीचा दुर्दैवी अंत होतो.

'समाधी' कथेत बहुजन समाजातील काही समूहात आज ही नात्याची पवित्र पाडल्या जात नाही. भारतात काही समूहातील लोक तर स्त्रियांना भोगाची वस्तू म्हणून स्त्रीकडे पाहिल्या जाते. सुनेला मूल होत नाही म्हणून सासरा मुलाचे दोष लपवून स्वतःच्या सुनेला ढोंगी महाराजाकडे सुपूर्द करतो व सुनेला गर्भार करून वंशाचा दिवा म्हणून नात करतो. परंतु नवऱ्याला जेव्हा ही घटना माहीत होते तेव्हा ढोंगी महाराजाचा खून करून आपल्या अंगणातच समाधी बांधतो. अजूनही समाजात वंशाचा दिवा म्हणून मूल हवं असते आणि जर मूल होत नसेल तर स्त्रीलाच दोष दिला जातो, हे या कथेतून बघायला मिळतं.

'बटई' कथेत स्त्रीलंपट रंगेल माणूस पवित्र नात्याला काळीमा फासतो. मुलगा वेडसर आहे म्हणून स्वतःच्या सुनेवर वारंवार बलात्कार करून गर्भार करतो आणि सून सासरा नात्याला कलंकित करतो. होणारा मुलगा म्हणजे 'बटई'. समाजात असे वाईट वृत्तीचे लोक असतात, आपल्या पवित्र नात्याला जपत नाहीत.

'शिवराम' कथेत बहुजन समाजातील माजलेले गाव खेड्यातील पाटील, पांडे, जमीनदार आपल्याच कुटुंबातील स्त्रियांवर आणि शेतात काम करणाऱ्या गरीब मजूर महिलांच्या अब्रूवर हात टाकतात. घरच्या बायकोचा मानसिक शारीरिक छळ करतात. शिवराम लहान भावाची बायको स्वतःच ठेवून घेतो. लग्नाची बायको आत्महत्या करते. मुले बिघडतात आणि भावाला विष देऊन संपवितो. इथे पवित्र नात्याला विषारी किनार लावून समाजात असे उदाम शिवराम समाज नासवतो; हे लेखिकेने सूक्ष्म निरीक्षण करून सुंदरतेचे लेबल लावलेली भारतीय संस्कृती आतुन किती विकृतीने बरबटलेली आहे हे दाखविले आहे.

'बाजा' कथा वेठबिगारी कशी बंद झाली हे दर्शविते. गरीब, निरक्षर व्यक्तींना शेठ, सावकार अल्प रोजंदारीवर जुंपत होते. बाजा मुका माणूस, त्याला हल्ल्यासोबत (बैल) शेतीच्या नांगराला जुंपतो व शेवटी बाजाचा खून करतो. शेवटी प्रकरण समोर येते, बाजाचा मुलगा पेंटा गाव मुखियासोबत रमय्या सावकाराला पकडून पोलिसाच्या स्वाधीन करतात. समाजात जागृती करून वेठबिगारी बंद करतात.

'संघर्ष' कथेत एका महिलेला न्याय मागण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो याचं जिवंत चित्रण कथेत आहे. एका महिलेला न्याय मागण्यासाठी पोलीस स्टेशनला जावे लागते परंतु वासनांध पोलिसच पोलीस स्टेशनमध्ये सेमलीवर बलात्कार करतात. शेवटी न्याय कुठे मागायचा गावातील लोक टोमणे मारतात अखेर सेमलीला गाव सोडावा लागतो.

'परिवर्तन' कथा समाजात परिवर्तन घडवून आणते. आदिवासी मुळात इतर धर्माचे नाही. आदिवासी समाजाच्या विशिष्ट चालीरीती, परंपरा, संस्कृती आहे परंतु इतर धर्माच्या प्रभावाने ते आपली संस्कृती विसरत चालले. समाजातील शिक्षित वर्ग समाज जागृती करीत आहेत. समाजाला मूळ संस्कृतीत परत येण्याचे आवाहन करतात, त्याला प्रतिसाद समाज देतो व परिवर्तन घडून येतो.

'अहेर' कथा पेशवेकालीन समाज व्यवस्थेचे वास्तव दर्शवितो. तत्कालीन समाज व्यवस्थेतील जमीनदार, मालदार, देशमुख, महाजन पूर्वापार चालत आलेल्या प्रथेनुसार समाजातील गरीब, निराश्रीत, दलित आदिवासी महिला नववधुंना अहेर भेटवस्तू देण्याच्या नावाखाली आपल्या वाड्यात बोलावून बलात्कार करतात. कथेतील रमी सावकारांचा खून करते आणि ही प्रथा कायमची बंद पाडते तेव्हा गावातील स्त्रिया जोरजोरात घोषणा देतात मोट्यारीनचा विजय असो! अहेराचा बदला अहेर! या कथेत संघर्षाविरुद्ध लढण्याची ताकद स्त्रियांमध्ये निर्माण झाली हे लेखिकेने मांडले आहे.

'भूक' कथेत आदिवासींच्या भुकेची आग मृत्यूच्या दारात कशी नेते हे विदारक चित्र दर्शविते. आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात कुपोषणाचे प्रमाण आहे. भामरागड, कुव्वाकोडी, कसनसूर तीपागड, पर्लकोटा, पामलगौतमी, इंद्रावती परिसरात माडिया जमात वास्तव करतात. अचानक पर्लकोटा, इंद्रवतीला महापूर येतो, पाणी गावात घुसते. जीव वाचवत लोक उंच डोंगराच्या आश्रयाला जातात. महापुरात जीवनोपयोगी सामान वाचविणे महत्त्वाचे की जीव? याचं विदारक चित्रण कथाकाराने चित्रित केले आहे.

'जनी' कथेत स्त्री फक्त उपभोग घेणारी वस्तू आहे. उपभोग घेणे आणि सोडून देणे एवढेच स्त्रीचे महत्त्व आहे. स्त्रीचा उपभोग घेण्यात जवळच्या नात्यातील माणसे कशी संधीची वाट बघत असतात, याचं चित्रण कथेत घडविलं आहे.

'धर्मकला' एका अतिशय गरीब अंगणवाडी सेविकेची दर्दनाक कथा आहे. पैशासाठी चटावलेला भ्रष्ट अधिकारी खोटे आरोप लावून तिला सेवेतून काढून टाकतो. भीक मागण्याची पाळी येते. तिच्या डोक्यात परिणाम होतो. रक्ताचा भाऊ इज्जत विकून पोट भरण्यास सांगतो. शेवटी धर्मकला बेवारस म्हणून मरते. मन हेलावून सोडणारी कथा आहे.

'अकरा लेकरांची माय' एका मुस्लिम परिवाराची कथा आहे. संशय हा रोग किती भयानक? रिक्षा चालकाची सुंदर पत्नी, सात मुली, कुटुंब नियोजन केलेल्या पत्नीला हातपाय तोडून जाळून टाकतो. कनवाळू मनाची बहीण मोळ्या विकून स्वतःची दोन मुलं सून नातं अशा एकूण अकरा लेकरांची आई होऊन मोळ्या विकून लहान झोपडीत राहून संसार चालविते. बहादूर मुस्लिम महिलेची ही कथा मनाचा ठाव घेते.

'बहिण भाऊ' कथेत नक्षलवादी म्हणून मारून टाकलेल्या माणसाच्या मुलाची कथा आहे. गाव सोडून दुसऱ्या गावाच्या रस्त्यावर झोपडीत बांधून राहणारा मुलगा रोजगार हमी व इतर मजुरी करून शिकतो. फुले, आंबेडकर, सावित्री, बिरसा, बाबुराव शेडमाके यांच्या शौर्य विचाराने प्रेरित होऊन झोपडीत फोटो लावतो. गाव जातीयवादी असते. गावातील बौद्ध मुलीवर गावातीलच मुले अत्याचार करण्यासाठी पाठलाग करतात. वेळ रात्रीची आदिवासी मुलगा त्या मुलीचं रक्षण करतो व तिला आपल्या घरी आणून शत्रूपासून तिचे संरक्षण करतो. शाहू, आंबेडकर, फुले, बिरसा, बाबुराव यांच्या विचाराने दोघेही बहीण-भाऊ होऊन गावातील जातीयवाद नष्ट करून एकोपा घडवून आणतात. समाजाला प्रेरणा देणारी ही कथा अतिशय प्रेरणादायी आहे.

'खातमा' कथेत नक्षलवाद आणि पोलीस धुम्मचक्रित निरपराध आदिवासी मुला-मुलींचा जीव जातो. कधीकधी नक्षलवाद म्हणून निरपराध मुला-मुलींचा नाहक बळी जातो. मगी आणि शाली या दोन आदिवासी मुलींचा नक्षलवादी म्हणून बळी गेला. याचं वास्तव चित्रण कथेत आले आहे.

**निष्कर्ष :**

१) शिकार फत्ते झाली कथासंग्रह स्त्री केंद्रित असून स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक, मानसिक अत्याचार व आदिवासी बहुजन वंचित घटकावरील शोषणाचा पाढा फोडण्याची काम केले आहे.
२) शिक्षणाचा अभाव असल्याने आदिवासी बहुजन समाजावर अनेक समस्या उभे आहेत.
३) नक्षलवाद आणि पोलिसांच्या धम्मचक्रित आदिवासींचे नाहक बळी जात आहे.
४) आदिवासी समाजाची गौरवशाली संस्कृती मांडलेली आहे.
५) वाईट प्रथांचा त्याग करून आधुनिक परिवर्तनाची आस धरावी हे सुचित केले आहे.
६) स्वातंत्र्यानंतरही आदिवासींचे शोषण थांबले नाही.
७) कथासंग्रहातील संवाद अल्पाक्षरी असून निवेदनांनी कथा पुढे सरकत जाते.
८) कथेत बोलीभाषेचा व वाक्यप्रचार, म्हणीचा समर्पक वापर केला आहे.

**संदर्भ :**

- उषाकिरण आत्राम, शिकार फत्ते झाली, सुधीर प्रकाशन वर्धा, प्र.आ. २०१८
- उषाकिरण आत्राम, अहेर, संगत प्रकाशन नांदेड,द्वी.आ. २०२४
- डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, आदिवासी साहित्य : एक अभ्यास,प्र.आ.२००९
- डॉ. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, प्र. आ.२०१२

- डॉ. संजय लोहकरे, 'फडकी', मे-जून २०१७
- एकनाथ आहेर, 'फडकी' ,फेब्रुवारी ते जुलै २०२१
- रंजना वडेकर, 'फडकी' , फेब्रुवारी-मार्च २०२२